# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५

ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in


क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/बारावी नंतरचे पदविका/औषधनिर्माणशास्त्र/कॅप फेरी ३ /५५६ दिनांक : २६/११/२०२४

## प्रवेशासाठीचे वेळापत्रक : कॅप फेरी - ३

## शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम वर्ष पोस्ट एचएससी (बारावी नंतरचे) पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम

संदर्भ : शासन पत्र क्र. मान्यता-२०२४/प्र.क्र.४२१/तांशि-४, दिनांक: २६/११/२०२४

संदर्भीय शासन पत्रास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता पोस्ट एचएससी (बारावी नंतरचे) पुर्णवेळ औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेसाठी कॅप फेरी - ३ साठी विकल्प अर्ज भरुन निश्चित करणे, कॅप फेरी - ३ जागा वाटप, झालेले जागा वाटप स्वीकारण्यापूर्वी स्वत: पडताळणी करणे, जागा वाटप स्वीकारणे, जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उमेदवारांनी उपस्थित राहणे, सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक या प्रक्रियेच्या माहितीसाठी ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया फेरी ३ साठीचे टप्पे आणि तारखा खालीलप्रमाणे आहेत.**

| केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया - फेरी ३ | | | |
|---|---|---|---|
| अनु.क्र | प्रक्रिया | सुरुवात तारीख | अंतिम तारीख |
| १. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीसाठी रिक्त जागा प्रदर्शित करणे. | २९-११-२०२४ | |
| २. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीसाठी उमेदवाराने, उमेदवाराच्या लॉगिनमधून पाठयक्रम व संस्था यांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाइन विकल्प नमुना भरणे व त्यास निश्चित करणे. | ३०-११-२०२४ | ०२-१२-२०२४ |
| ३. | वाटप केलेली संस्था आणि पाठयक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीसाठी तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे | ०४-१२-२०२४ | |
| ४. | प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची, उमेदवाराने त्याच्या/ तिच्या लॉगइनद्वारे स्वीकृती करणे;<br>टिप: तिसऱ्या फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र असलेल्या उमेदवारांपैकी ज्यांना जागावाटप झालेले आहे असे सर्व उमेदवार स्वयं-पडताळणीनंतर जागेचा स्वीकार करु शकतील. तिसऱ्या फेरीत पहिल्यांदाच जागा वाटप झालेल्या उमेदवारांनी जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा भरावी. | ०५-१२-२०२४ | ०७-१२-२०२४ |
| ५. | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) तिसऱ्या फेरीनंतर जागा वाटप झालेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे आणि आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरुन प्रवेशाची निश्चिती करणे.<br>टिप: तिसऱ्या फेरीमध्ये पात्र उमेदवारांपैकी ज्या उमेदवारास प्रथमच जागावाटप करण्यात आले आहे किंवा जागा वाटपात सुधारणा झाली आहे किंवा या फेरीमध्ये जागा वाटपात सुधारणा झाली नाही / आधीची वाटप केलेली जागा, असे जागावाटप अंतिम असेल. प्रवेशाच्या पुष्टीकरणासाठी अशा उमेदवारांनी वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे. | ०५-१२-२०२४ | ०७-१२-२०२४ |

***

| | | |
|---|---|---|
| १. | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठीच्या सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक | १३-१२-२०२४ सायं. ०५.०० पर्यंत |
| २. | संस्थांसाठी: डेटा अपलोड करण्याची शेवटची तारीख (प्रवेशित झालेल्या उमेदवारांचा तपशील) | १३-१२-२०२४ |

**महत्वाची टीप: -**

१. अंतिम गुणवत्ता यादीमध्ये ज्यांची नावे नोंदली गेली आहेत अशा सर्व प्रकारच्या उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी (कॅपद्वारे) प्रवेशासाठी विचारात घेतले जाईल.

२. संस्थास्तरावरील कोट्यामधे व कॅपनंतर रिक्त राहिलेल्या जागांत प्रवेश घेण्यास इच्छुक उमेदवारांनी ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत याद्वारे नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज भरल्याची निश्चिती करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी प्रवेशासाठी संस्थांमध्ये स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांची गुणवत्तायादी, संस्था पातळीवर संस्थेद्वारे तयार केली जाईल.

३. प्रवेशप्रक्रियेच्या कॅप व्यतिरिक्त जागांसाठी ऑनलाईन नोंदणी व कागदपत्रांची पडताळणी, अर्ज निश्चिती करणे या प्रक्रिया प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत (कट ऑफ डेट पर्यंत) सुरू ठेवल्या जातील. दि. ०६-१०-२०२४ नंतर ई-स्क्रूटनी पद्धतीद्वारे किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पद्धतीद्वारे नोंद होणारे, पडताळणी व निश्चित होणारे अर्ज संस्था स्तरावरील व कॅपव्यतिरिक्त जागांसाठीच विचारात घेतले जातील.

४. ऑनलाईन अर्ज भरणे व निश्चित करणे याकरिता उमेदवारांच्या सोयीनुसार "ई-स्क्रूटनी" व "प्रत्यक्ष स्क्रूटनी" छाननी पद्धतीची माहिती, प्रवेशासाठीचे पात्रतेचे निकष, अर्ज भरण्यासाठीचे शुल्क, उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना इत्यादी सर्व बाबी संचालनालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२४/बारावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/औषधनिर्माणशास्त्र/३४९, दिनांक: ०७/०८/२०२४ च्या प्रवेशासाठीच्या परिपत्रकानुसार राहतील.

उमेदवारांना महत्वाच्या सूचना:

१. एकदा उमेदवाराने संबंधित प्रवेश फेऱ्यांसाठी त्याच्या/तिच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन विकल्प अर्जाची निश्चिती केली की, उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत सादर केलेला पर्याय / प्राधान्य बदल करण्याची / रद्द करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

२. संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या जागा वाटपाच्या यादीमध्ये, उमेदवारांना देऊ करण्यात आलेल्या तात्पुरत्या जागांचे वाटप दर्शविण्यात येईल. या संदर्भात उमेदवारांशी व्यक्तिश: कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना जागावाटप पत्रे पाठविली जाणार नाहीत.

३. ज्या उमेदवारास जागेचे वाटप करण्यात आले असेल अशा उमेदवारांनी "तात्पुरते जागावाटप पत्र" संकेतस्थळावरुन त्याच्या लॉगइन मधून डाऊनलोड करुन घ्यावे.

४. सर्व उमेदवारांसाठी जागा-स्वीकृती शुल्क ₹१,०००/- (रुपये एक हजार फक्त) एवढे आहे. उमेदवाराला जागावाटपानंतर कागदपत्रांच्या पहिल्या स्वयं-पडताळणी दरम्यान जागा-स्वीकृती शुल्क भरावे लागते. हे शुल्क ना-परतावा प्रक्रिया शुल्क आहे. उमेदवारांना जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरणा करावे लागेल.

५. उमेदवार संस्थेत प्रवेश घेण्यासाठी हजर होण्याच्या वेळेस, अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ सर्व मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवार अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ मूळ प्रमाणपत्र सादर करणार नाही अशा परिस्थितीत जागावाटप आपोआप रद्द होईल व ती जागा पुढील फेरीमध्ये वाटपासाठी उपलब्ध होईल. अधिसूचित वेळापत्रकानुसार कागदपत्रांच्या स्वयं-पडताळणीच्या टप्प्यावर उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे तयार ठेवण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

६. नंतरच्या टप्प्यात, उमेदवाराने अर्जात केलेल्या खोट्या दाव्यांवरून उमेदवाराला जागावाटप झालेले आहे असे आढळल्यास, असे जागावाटप/संस्थेमध्ये घेतलेला प्रवेश आपोआप रद्द होईल.

७. ई-स्क्रूटनी पध्दतीच्या किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीच्या वेळी, उमेदवार अर्जामध्ये केलेला दावा सिद्ध करण्यासाठी सुसंगत आणि वैध कागदपत्रे सादर करतील. संबंधित कागदपत्रे सादर न केल्यास, उमेदवार अर्जात केलेले असे दावे गमावतील आणि अशा दाव्यांचा विचार न करता अशा उमेदवारांच्या अर्जांची निश्चिती केली जाईल.

८. राखीव प्रवर्गाचे उमेदवार म्हणून नोंदणी केलेले परंतु ई-स्क्रूटनी पध्दतीच्या किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीच्या कागदपत्रांच्या पडताळणीच्या टप्प्यात, राखीव प्रवर्गाच्या दाव्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र सादर करण्यास असमर्थ असलेल्या उमेदवारांना सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार समजले जाईल व त्याना ₹१००/- चे शुल्क फरकाची रक्कम फक्त ऑनलाईन पद्धतीने भरावे लागेल.

९. तक्रार/हरकत नोंदविण्यासाठी प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत निवडणारे उमेदवारांना सुविधा केंद्रावर कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी आवश्यक सर्व मूळ कागदपत्रे सादर करावी लागतील.

## सर्वसाधारण टिप:

१. ज्या उमेदवारांनी प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीचा पर्याय निवडला आहे असे उमेदवार सुविधा केंद्रात उपलब्ध असलेल्या आयटी सुविधेचा वापर करून त्यांचे अर्ज भरणे, स्कॅनिंग करणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज निश्चित करणे या कामाकरिता विनाशुल्क लाभ घेऊ शकतात.

२. प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीसाठी : सुविधाकेंद्रांची (एफसीची) यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे आणि ही सुविधाकेंद्रे नियोजित काळात सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६००. या वेळेत सुरु असतील.

३. प्रवेशासाठी पात्रता व नियम संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

४. वरील घोषित वेळापत्रक हे अस्थायी स्वरुपाचे आहे आणि यामधे अपरिहार्य स्थितीमधे बदल संभवु शकतो. जर, सुधारित वेळापत्रक घोषित झाले तर ते **https://phd24.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. अधिक माहितीकरिता संकेतस्थळावर अथवा संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्या कार्यालयामध्ये संपर्क साधावा.

५. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत .

६. चौकशी करिता व आयटी सुविधे करिता जवळच्या सुविधा केंद्राशी संपर्क साधावा.

७. मदतकक्ष क्रमांक **7669100257 / 18003132164** सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई